जा.क्र.न.पि./का.मा.सू १३-१४/प्र.क्र-६०१/वि.प्र.३/२४४/२०१३

कृषि आयुक्तालय, साखर संकुल,शिवाजीनगर, पुणे-५

दिनांक : १/६/२०१३

**प्रति,**

**१) विभागीय कृषि सहसंचालक (-------------)**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा- ----------------**

**विषयः- कापूस तंत्रज्ञान अभियानांतर्गत केंद्र पुरस्कृत सधन कापूस विकास कार्यक्रम सन २०१३-१४ मध्ये राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना...**

**संदर्भ :- ------------------------------------------**

सदर योजना कापूस तंत्र अभियान या अभियानांतर्गत सन २०००-०१ पासून राज्यात राबविण्यात येत आहे.

या अभियाना अंतर्गत एकूण चार उपअभियान आहेत.ते पुढीलप्रमाणे

१) उपअभियान-१ - संशोधन कार्य

२) उपअभियान-२ - कापूस तंत्र प्रसारण

३) उपअभियान-३ - विपणनाच्या पध्दतीत सुधारणा व सोयीसुविधा निर्माण करणे.

४) उपअभियान-४ - जिनींग आणि प्रेसींग यांचे बळकटीकरण करणे.

सधन कापुस विकास योजना सन २०१३-१४ मध्ये राबविताना १०० हेक्टर लघुप्रकल्पामध्ये राबविणे बंधनकारक राहिल. त्यानुसार लघु प्रकल्प आराखडा तयार करावा. या प्रकल्पाचे उदीष्ट व त्यावरुन जो परिणाम अपेक्षित आहे यांची नीट मांडणी करुन लघु प्रकल्प तयार करण्यात यावे. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे, यांचा प्रगती अहवाल तयार करण्यात यावा. तसेच विविध बाबी राबवितांना फोटोसहीत यशोगाथा तयार करण्यात यावी.

**प्रकल्प तयार करतांना खालील बाबीचे पालन करावे**.

कापुस पीकाचे क्षेत्रानुसार तसेच जेथे क्षेत्र वाढीस व उत्पादकता वाढीस वाव आहे याचा विचार करुन तालुकानिहाय/मंडलनिहाय राबवावयाचे लघुप्रकल्पांची संख्या खालील प्रपत्र-१ प्रमाणे निश्चित करावी व संबंधिताना तसे कळविण्यात यावे व प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

## अभियानाचे उद्दिष्टे -

कापसाचे उत्पादन आणि उत्पादकता वाढवून कापसाची देशांतर्गत गरज भागवून अधिकचा कापूस निर्यात करणे.

कापसाचा उत्पादन खर्च कमी करणे आणि किटकनाशकांचा वापर कमी करणे, जेणेकरुन किमतीच्या बाबतीत आपला कापूस अंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करु शकेल

www.mahaagri.gov.in

## प्रपत्र-१

## जिल्हनिहाय प्रकल्प संख्या

| अ.क्र | जिल्हा | क्षेत्र आधारे प्रकल्प संख्या |
|---|---|---|
| १ | नाशिक | १ |
| २ | धुळे | १ |
| ३ | नंदुरबार | १ |
| ४ | जळगाव | २ |
| ५ | अहमदनगर | २ |
| ६ | औरंगाबाद | १ |
| ७ | जालना | १ |
| ८ | बीड | १ |
| ९ | नांदेड | १ |
| १० | परभणी | २ |
| ११ | हिंगोली | १ |
| १२ | बुलढाणा | २ |
| १३ | अकोला | १ |
| १४ | वाशिम | १ |
| १५ | अमरावती | १ |
| १६ | यवतमाळ | २ |
| १७ | वर्धा | १ |
| १८ | नागपूर | १ |
| १९ | चंद्रपूर | १ |
| **एकुण** | | **२४** |

www.mahaagri.gov.in

प्रकल्प अहवाल तयार करताना खालील बाबींचे मुलभुत सर्वेक्षण करण्यात यावे.

१) निवडलेल्या क्षेत्रातील पीकनिहाय क्षेत्र,पीक पध्दतीचा तपशील.

२) सर्व पीकनिहाय वाणनिहाय क्षेत्र व वाण निहाय उत्पादकतेचे लक्षांक निश्चीत करावेत.

३) जमिन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र,स्फुरद, पालाष व सुक्ष्ममुलद्रव्ये

४) उपलब्ध सिंचन सुविधा त्यातुन सिंचना खालील क्षेत्र व कापुस पिकासाठी उपलब्ध होणारे सिंचन (क्षेत्र)

५) पीकनिहाय निविष्ठा वापराचे सध्याचे प्रमाण व संपुर्ण प्रकल्पासाठी लागणारे बियाणे, खते, व त्याची उपलब्धता इ.

६) कापूस पिकावर फवारणीसाठी प्रकल्पातील शेतक-यामधून सेवा पुरवठादाराची नेमणूक करावी. त्यासाठी इतर योजनांचा सहभाग घेण्यात यावा. व तसे प्रकल्प आराखडयात नमुद करावे.

७) कापुस वेचणीसाठी उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळ

८) निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा तसेच तयार झालेल्या वेचणी झालेल्या कापसाची प्रतवारी नुसार

पणन व्यवस्था. वरील सर्व मुदयावर निवडलेल्या प्रकप क्षेत्राचे सखोल सर्वेक्षण करून प्रकल्प अहवाल तयार करावा. त्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची मान्यता घेवून प्रकल्प अंमलबजावणी सुरू करावी.

## प्रत्यक्ष प्रकल्प अमंलबजावणी :-

उपरोक्त बाबींचा विचार करुन प्रकल्प आराखडा तयार करावा. लघु प्रकल्पाची आखणी शेतीशाळा ही बाब आधारभुत घेवुन करावी. प्रत्येक प्रकल्पामध्ये खालील बाबींचा समावेश करून अंमलबजावणी

**१) पिक उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रिय प्रात्याक्षिके- २५० प्रात्याक्षिके प्रति १०० हे. प्रकल्प**
**२) शेतीशाळा - ५**
**३) जैविक किड नियंत्रण व जैविक औषधे प्रात्यक्षिके - १०० हे./प्रकल्प**

करावी.सर्व प्रात्यक्षिके शिफारशीत सुधारीत वाणांची (नॉन बीटी वाणं) व ब्राझील तंत्रज्ञानावर आधारीत ध्यावयाची आहेत. प्रकल्पातील सर्व लाभार्थ्यांना ०.४० हे. प्रात्यक्षिंकाच्या मर्यादेत लाभ दयावयाचा आहे.

उत्पादकता वाढीचे लक्षांक ठरविण्यात यावेत व त्याचे नियोजन करण्यात यावे. लक्षांक ठरविताना सर्वात जास्त साध्य झालेल्या उत्पादकते पेक्षा १५ टक्के जास्त लक्ष निर्धारीत करण्यात यावे.

प्रकल्प आराखडा तयार करण्यास तसेच यशोगाथा तयार करण्यास प्रत्येक प्रकल्पासाठी रु. ६.७५ लाख प्रमाणे राहिल. संकीर्ण खर्च व अधिकारी भेटीसाठी उपलब्ध निधी मधुन खर्च करण्यात यावा.

१) सर्व प्रकल्प शेतक-यांचे गट करुन कार्यक्रम गटामार्फत राबविण्यात यावेत.

२) सर्वसाधारणपणे १० हेक्टरचे गट तयार करून प्रत्येक १० हेक्टर मागे एक गटप्रमुख म्हणुन एका प्रगतिशील शेतक-याची निवड करण्यात यावी म्हणजेच एका प्रकल्पामध्ये सर्वसाधारण १० गट तयार करुन त्याचे प्रत्येकी १ प्रमाणे १० गटप्रमुखांची निवड करावी.

३) प्रकल्पामध्ये प्रत्येक गटामध्ये राबवावयाच्या बाबींची माहीती खाली प्रपत्र-२ मध्ये देण्यात आलेली आहे.

४) गटप्रमुखांच्या सहाय्याने राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन, प्रात्यक्षिकात अवलंब करावयाच्या तंत्रज्ञानाचा तपशील सविस्तरपणे नमुद करण्यात यावा. तसेच त्याचे वेळापत्रकही तयार करण्यात यावे.

५) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ,महाराष्ट्र लघु उदयोग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांचे कडून निविष्ठा उपलब्ध करून घ्यावयाच्या आहेत.

६) प्रकलपाबाहेर राबवावयाचा बाबनिहाय कार्यक्रम प्रपत्र -३ मध्ये देण्यात आला आहे. सदर प्रपत्रात राबविण्यात येणा-या बाबी मध्ये प्रवर्तकाचे प्रशिक्षण. यांचा समावेश आहे.

७) कार्यक्रम राबविण्यासाठी समाविष्ट घटकाबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना सोबत देण्यात आलेल्या आहेत. त्याचे वाटप करतांना अनुसूचित जातींना ९.८८ टक्के, अनुसूचित जमातींना ८.५४ टक्के व डतर लाभार्थ्यांना ८१.५८ टक्के व या मध्ये महिला लाभार्थ्यांना ३० टक्के त्याप्रमाणे लाभ देण्यात यावा.कार्यक्रम व अनुदान वाटप सदरच्या विगतवारीनुसार वितरीत करण्यात आले आहे. विभागीय कृषि सह संचालक यांनी त्यांचे स्तरावरून वरील टक्केवारी

www.mahaagri.gov.in

भौतिक /आर्थिक कार्यक्रमाची अंमलबजावणीबाबत संनियंत्रण करावे.

## प्रपत्र-२

# प्रकल्पातील समाविष्ट कार्यक्रम

## (एका गटासाठी- क्षेत्र १०० हेक्टर)

**(रु.लाख)**

| अ.क्र | घटक | परिमाण | अनुदानाचा दर (रु.) | एका प्रकल्पातील कार्यक्रम | | एकुण कार्यक्रम (२४ प्रकल्प) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | पीक उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रीय प्रात्यक्षिक | संख्या | रु.२०००/- प्रति प्रात्यक्षिक (प्रात्यक्षिक क्षेत्र ०.४० हेक्टर) | २५० | ५.०० | ६००० | १२०.०० |
| २ | शेतकरी शेतीशाळा | संख्या | रु.१७,०००/-प्रति शेतीशाळा (३० शेतकरी पूर्ण हंगामाकरिता) | ५ | ०.८५ | १२० | २०.४० |
| ३ | जैविक किड नियंत्रण व जैविक औषधे प्रात्यक्षिके (Bio agent and Bio pesticides Demo) | हेक्टर | औषधाच्या किमतीच्या ५० टक्के किंवा रू.९००/-/-प्रति हे. च्या मर्यादेत यापैकी कमी असेल ते. | १०० | ०.९० | २४०० | २१.६० |
| | **एकूण** | | | | **६.७५** | | **१६२.००** |

उपरोक्त बाबीचा विचार करुन लघुप्रकल्प आराखडा तयार करावा व क्षेत्र, उत्पादकता वाढीचे लंक्षाक ठरविण्यात यावे.केंद्रिय पातळीवर नवीन योजनेची आखणी झालेली असून येत्या खरीप हंगामापासून कापूस पिकामध्ये घन लागवठ पद्घत (HDPS) अंमलबजावणीचा कार्यक्रम कापूस संशोधन केंद्र (CICR) नागपूर यांचेमार्फत राबपिण्यात येत असलेल्या लागवडीच्या पध्दतीनुसार लागवड करण्यात यावी. याबाबत सविस्तर सुचना यापुर्वीच या कार्यालयाचे पत्र क्र. जाक्र/कृआ/कउसं-विप्र-३/कापूस/२२९/२०१३ दि २४/५/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

प्रकल्पा बाहेरील राबवावयाचा बाबनिहाय कार्यक्रम

www.mahaagri.gov.in

**प्रपत्र-३**

**(रु.लाखात)**

| अ.क्र | घटक | परिमाण | अनुदानाचा दर (रु.) | भौतिक | आर्थिक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रवर्तकांना प्रशिक्षण | संख्या | रु.१०.०० लाख/टी.ओ. एफ. (६ महिन्याचे प्रशिक्षण कालावधीसाठी) | ३ | ३०.०० |
| २ | शेतकरी शेतीशाळा | संख्या | रु. १७,०००/-प्रति शेतीशाळा (३० शेतकरी पूर्ण हंगामाकरिता) | १३९ | २३.६३ |
| ३ | जैविक किड नियंत्रण व जैविक औषधे प्रात्यक्षिके | हेक्टर | औषधाच्या किमतीच्या ५० टक्के किंवा रू.९००/-/-प्रति हे. च्या मर्यादेत यापैकी कमी असेल ते. | २८१८ | २५.३६ |
| ४. | आकस्मीक निधी | | | | २.३८ |
| **एकुण** | | | | | **८१.३७** |

वरीलप्रमाण प्रर्वतकांचे प्रशिक्षण कृषि महाविद्यालय परभणी, अकोला, कृषि विज्ञान केंद्र अकोला येथे घण्यात यावे सदर स्थळी आयोजनात काही अडचण असल्यास विभागीय कृषि सह संचालक यांनी स्थळ निष्चीती करण्यास हरकत नाही.

प्रकल्पातील निविष्ठा उपलब्धताः- या कार्यक्रमातील काही घटक राबविण्याची पूर्वतयारी आतापासूनच सुरु केली, तर ते खरीप हंगामात यशस्वीरित्या राबविता येतील. त्यामुळे चालू वर्षी सदर योजना राबविण्याचे पूर्ण नियोजन आतापासूनच करुन ते खरीप २०१३ मध्ये यशस्वीपणे राबविता यावेत, म्हणून या मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

सुधारीत वाणांचे (नॉन बीटी वाणं) बियाणे वाटप, प्रवर्तकांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करणे, शेतीशाळांचे आयोजन करणे, पिक उत्पादकता वाढविण्यासाठीची अद्यावत ब्राझील तंत्रज्ञानावर(अतिघन कापूस लागवड) आधारित प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे, उपरोक्त घटकांचे सखोल नियोजन करुन, लाभार्थींची निवड करुन ठेवल्यास हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविता येऊ शकेल. तसेच त्यामुळे केंद्र शासनाने विहित करुन दिलेली उद्दिष्टे साध्य करण्यास त्यामुळे भरीव मदत होणार आहे.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येतो किंवा कसे हे पाहण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीयस्तरावरील सनियंत्रण समिती राज्यात येते. त्यावेळी या समितीस यशोगाथा दाखविता याव्यात याकरिता खरीप हंगामात हे घटक राबविण्याची पूर्वतयारी आतापासूनच केल्यास या सनियंत्रण समितीस या कार्यक्रमामधून साध्य झालेली कामे दाखविता येऊ शकतील.

उपरोक्त घटक राबविण्यासाठी विचारात घ्यावयाचे निकष पुढे दिले आहेत. सदर निकष विचारात घेऊन हे घटक राबविण्याचे सविस्तर नियोजन करावे.

www.mahaagri.gov.in

निविष्ठा खरेदी करणेकरीता व संनियंत्रण करणेकरीता विभागीय कृषि सह संचालक यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. विभागीय कृषि सह संचालक | अध्यक्ष |
| २. कृषि चे संबंधित विषयाचे शास्त्रज्ञ | सदस्य |
| ३. बियाणे महामंडळ, राष्ट्रीय बीज निगम, कृषि उदयोग विकास महामंडळ, मार्कफेड संस्थेचे स्थानिक प्रतिनिधी | सदस्य |
| ४. संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

पीक प्रात्यक्षिके  राबविण्यासाठी निविष्ठा खरेदी करावयाच्या आहेत त्या निविष्ठासाटी सर्व निविष्ठांची मान्यतेनुसार पुरवठादार संस्थेकडे मागणी नोदविण्यात येवून त्याची एक प्रत आयुक्तालयास सादर करावी. सर्व निविष्ठा व औजारे वेळेत उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सह संचालक यांची राहील. कोणत्याही परिस्थितीत पुरवठा केलेल्या निविष्ठा पडून राहणार नाहीतयाची दक्षता संबंधित विभागीय कृषि सह संचालक यांनी घ्यावी.

विभागीय कृषि सह संचालक यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घेवून निविष्ठा पुरवठा आदेश संचालक (निवगुनि) यांनी निश्चीत केलेल्या पुरवठादार संस्थेकडे मागणी नोदविण्यात यावी. निविष्ठाची निश्चीती करताना निविष्ठा शिफारस केलेल्या मात्रांनुसार घेणेत याव्यात आणि अनुज्ञेय असलेले अनुदान वजा जाता उर्वरीत रक्कम लोकवाटा म्हणून शेतक-याकडून घेवून संबंधित संस्थेकडे भरणा करावी.

योजनेच्या अंमलबजावणीमध्ये शेतकरी वाटा हिस्सा यांचा समावेश असून सदर हिस्सा क्षेत्रिय स्तरावर क्षेत्रिय कर्मचा-यामार्फत शेतक-याकडून गोळा केला जातो हा हिस्सा प्राप्त होताच सत्वर संबंधित पुरवठादार संस्थेकडे भरणा करण्यासाठी कार्यालयात जमा करावा.याबाबत मा. आयुक्त (कृषि) यांचे कक्षामधून लेखा विषयक कार्यपदधतीबाबत सविस्तर परिपत्रक निर्गमित केले आहे. शेतकरी वाटा कार्यालयात जमा करण्यास दिरंगाई हा अपहार समजून याबाबत विलंब आढळल्यास कार्यालय प्रमुखाने संबंधिताबाबत प्रशासकिय कार्यवाही करावी. अन्यथा कार्यालय प्रमुखास जबाबदार धरण्यात येपून याबाबत त्यांचे विरूध्द आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. पुरवठा करण्यात आलेल्या सर्व निविष्ठांचे प्रत्येक बॅचेसचे नमुने काढेन प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावेत. अप्रमाणित निविष्ठांची देयके अदा करू नयेत.

## कार्यक्रम राबविण्यासाठी विचारात घ्यावयाचे मुद्दे :-

या कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेले घटक राबविण्यासाठी घटकनिहाय स्वतंत्र विचार करण्याऐवजी, त्यांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टिने कार्यकमांतर्गत कुठल्याही घटकांची कार्यवाही स्वतंत्रपणे न करता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत समाविष्ठ असलेल्या सर्व यंत्रणांकडून जसे विस्तार यंत्रणा, अशासकिय संस्था, कृषि विज्ञान केंद्रे, कृषि विद्‌यपीठे, शेतक-यांच्या स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सेवाभावी संस्था यांचेकडून त्यांनी केलेल्या मूलभूत सर्वेक्षणात त्यांना उत्पादन वाढीच्या दृष्टिने आढळलेल्या समस्यांचे आधारे स्थानिक गरजा विचारात घेऊन व सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन कार्यक्रम राबविण्यात यावा.  योजनेतील क्षेत्र हे काही गावे किंवा

www.mahaagri.gov.in

गावांचा समूह राहील. त्यांनी योजनेतील राबवायाच्या बाबींचा परिणाम जाणवेल, अशा रितीने कार्यक्रम राबविण्यात यावा. मूलभूत सर्वेक्षण, संशोधनाच्या गरजा इत्यादीं बाबी राष्ट्रीय कृषि तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत एस.आर.ई.पी. प्रमाणे राहतील. त्यात कार्यक्रमाचा आराखडा, अंमलबजावणी संनियंत्रण व परिणामकारकतेचा आढावा या बाबी अंतर्भूत राहतील. या बाबत यशोगाथासह यशस्वीतेचा अहवाल संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सादर करावयाचा आहे.

## खाजगी क्षेत्राच्या सहभागाने प्रकल्प अंमलबजावणी सन २०१३-१४ : -

विविध पिकांची उत्पादकता व उत्पादन वाढविण्यासाठी नियमीत योजना अंमलबजावणी मधे खाजगी क्षेत्राचा सहभाग घेतल्यास पिकांची उत्पादकता व उत्पादन वाढण्यास भरीव मदत होईल व पर्यायाने शेतकऱ्यांची आर्थिक विकास होईल.

सन २०१३-१४ मध्ये ही सदरचा कार्यक्रम शासनाने मंजूर केलेला आहे. कापूस विकास योजना मधील प्रस्तावीत प्रकल्प अंमलबजावणीसाठी न्युजीवुड सिड लिमिटेड व जैन इरिगेशन लिमिटेड या खाजगी कंपन्यांची निवड करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प न्युजीवुड सिड लिमिटेड या खाजगी कंपनीने जळगांव, धुळे, औरंगाबाद, जालना, बीड, यवतमाळ व वर्धा जिल्हयामध्ये खालील तालुक्यात प्रकल्प अंमलबजाणीसाठी सहमती दर्शविली आहे.

एकुण २०००० हेक्टर क्षेत्रावर हा कार्यक्रम या खाजगी कंपनीच्या सहभागाने राबविण्यात येणार आहे.या बाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. जाक्र/नपि/कापूस/प्रकल्प/विप्र-३/१५९/दि. ९/४/२०१३ व जाक्र/नपि/कापूस/प्रकल्प/विप्र-३/२३०/दि.२४/५/२०१३ अन्वये स्वतंत्र मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत. सदर प्रात्याक्षिके अंमलबजावणीसाठी लागणा-या आवश्यक निविष्ठा या संबधित खाजगी कपंनीचे क्षेत्रिय प्रतिनिधी यांचेशी चर्चा करुन अंतिम करण्याच्या आहेत.

**कृषि संचालक,**
**(विस्तार व प्रशिक्षण),**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

**१) प्रतः- माहितीस्तव सविनय साद**
मा.प्रधान सचिव, कृषि पशंसुवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई -३२
२) मा. मंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.
३) मा. राज्यमंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक

**प्रतः- माहितीस्तव सस्नेह अग्रेषित**
४) कृषि संचालक (सर्व)
५) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि औदयगिक विकास महामंडळ, राजनहाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई २५.
६) मा. व्यवस्थापकीय संचालक ,मार्केटींग फेडरेशन मुंबई
७) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला
८) मा. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय बीज निगम, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ३७.
९) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघुउदयोग विकास महामंडळ, मुंबई.

www.mahaagri.gov.in

१०) मा.संचालक, कापूस निदेशनालय, डी.ओ.सी.डी. मुबंई-४०००३८ यांना माहितीसाठी सादर.
११) संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
१२) संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी.
१३) संशोधन संचालक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

**प्रति सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.**

१) कृषि उपसंचालक, आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
२) कृषि माहिती अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी
३) कृषि उपसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे-५
४) कक्ष अधिकारी (४अे), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -३२
५) कार्यासन अधिकारी, नि.व.गु.नि.-५, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-१
कार्यासन अधिकारी, विप्र -१२, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-५

## प्रकल्पातर्गत राबविण्याचे घटक :-( जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तर)

पीक उत्पादन तंत्रज्ञान प्रात्यक्षिक- (१०० टक्के केंद्र हिस्सा)यासाठी लागणा-या निविष्ठा खरेदी बाबत जिल्हा समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव पाठवून विभागीय कृषि सह संचालक यांवेकडून मान्यता घेवून पुरवठा आदेश संचालक (नि.व. गु.नि.) यांनी निश्चीत केलेल्या पुरवठादार संस्थेकडे मागणी नोंदवावी.सधन लागवड पध्दतीसाठी संपुर्ण बियाणे प्रात्यक्षिक घटकातून घेण्यात यावे. उर्वरीत रकमेतून इतर आवश्यक निविष्ठा शिफारस केलेल्या मात्रेप्रमाणे/पात्र प्रमाणपत्र घेवून उर्वरीत रक्कम लोकवाटा म्हणून घेण्यात यावे.कापसाच्या शिफारशीत सुधारीत वाणांची (नॉन बीटी वाणं) आवश्यक बियाणे मागणी माहाबीज यांच्याकडे तातडीने नोंदविण्यात यावी.
एच.डी.पी.एस अंतर्गत पीक प्रात्यक्षिकातील पुरवठा करावयाच्या निविष्ठांचा खर्चाचा तपशील.

| अ.क्र | बाब | आवश्यक मात्रा | दयावयाचे अनुदान (रू. १०० टक्के) |
|---|---|---|---|
| १. | सुधारीत बियाणे पुरवठा | ५ किलो | ४७५.०० |
| २. | ग्रोथ रिटार्डंट | १५० मिली | ८०.०० |
| ३. | खते | | ० |
| | युरिया | ५० किलो | २८५.०० |
| | एस.एस.पी. | १०० किलो | ८००.०० |
| ४. | झिंक सल्फेट | ५ किलो | २००.०० |
| ५. | बोरॅक्स | २ किलो | १२०.०० |
| | | | २०६५.०० (प्रत्यक्ष देय अनुदान अनुदान रु. २०००.००) |

www.mahaagri.gov.in

सर्व प्रात्यक्षिकामध्ये  सुधारीत वाणांची (नॉन बीटी वाणं) ब्राझील तंत्रज्ञानावर आधारीत अति घन लागवडीची प्रात्यक्षिके ध्यावयाची आहेत.

१) ०.४० हेकटर क्षेत्रावर प्रात्यक्षिक आयोजित करण्यात यावे.

२) ०.४० हेक्टर प्रात्यक्षिक क्षेत्रासाठी साठी रु.२०००/- आर्थिक अनुदान देय आहे

३) प्रत्येक प्रात्यक्षिक क्षेत्रात मृद व जलसंधारण बाबींचा अंतर्भाव अनिवार्य राहील.

४) एका लाभार्थीस एकच प्रात्यक्षिक देण्यात यावे.प्रत्येक प्रात्यक्षिक प्लॉट शेजारी तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी नियंत्रित प्लॉट निवडावा.प्रात्यक्षिकासाठी  कृषि विदयापीठांनी शिफारस केलेल्या निविष्ठांचा वापर करावा.

५) केंद्रीय कपास अनुसंधान संस्था नागपूर यांनी प्रात्यक्षिकासाठी केलेल्या शिफारशी मार्गदर्शक सुचना सोबत जोडण्यात आलेल्या आहेत. त्याचाही वापर करण्यात यावा.

१) प्रात्यक्षिक क्षेत्रात पिक फुलो-यावर असतांना २ टक्के युरियाची फवारणी करण्यात यावी. बोंडे वाढ अवस्थेत २ टक्के डीअेपीची फवारणी करण्यात यावी. यामुळे उत्पादनांत १० टक्के वाढ दिसून आलेली आहे.

२) कापूस लाल्या नियंत्रणासाठी मेगॅनिशियम सल्फेटची (सुक्ष्म मुलद्रव्ये) ०.२ टक्के द्रावणाची कापूस वाढीच्या अवस्थेत लागणीनंतर ४५ आणि ७५ व्या दिवशी फवारणीत करण्यात यावी. यामध्ये २ ते १४ टक्के उत्पादनात वाढ दिसून आलेली आहे.

३) कोरडवाहू कापूस पिकासाठी लागणीनंतर ४५ व्या आणि ७५ व्या दिवशी २ टक्के एमओपी द्रावणाची फवारणी केली असता उत्पादनात सरासरी १९ टक्के वाढ दिसून आलेली आहे.

लाभार्थ्याची निवड व क्षेत्राची निवड निश्चित झाल्यानंतर प्रात्यक्षिक जमिनीचा उतार, जमिनीचा पोत व सुपिकता, पाण्याचा निचरा इत्यादी बाबींचा विचार करुन पिक प्रात्यक्षिकामध्ये जमिनीच्या समस्यावर आधारीत उपचार पध्दती ठरविण्यात याव्यात. उदा. जमिनीच्या उतारानुसार समपातळीमध्ये लागवड वा जमिनीच्या उतारास आडवी लागवड, सरी वरंबा पध्दतीने मशागत, सुपिकता व पोत सुधारण्यासाठी हिरवळीची खते, सेंद्रिय खते इत्यादीचा वापर, पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने चरांची व्यवस्था इत्यादीचा अंतर्भाव असावा. पाऊस व हवामानानुसार योग्य बियाण्यांची निवड, पेरणीची योग्य वेळ, बींज प्रक्रिया व दोन रोपातील योग्य अंतर या बाबी पिक प्रात्यक्षिकामध्ये कटाक्षाने पाळण्यात याव्यात. कापसाचे एकच पीक (Sole Crop)  घेण्याऐवजी, कापूस हे पीक आंतर पिकासह घेतल्यास, केवळ कापूस पिकापेक्षा अंतर पिकासह कापूस पिकाचे उत्पादन हे अधिक फायदयाचे असल्याचे प्रयोगाअंती सिध्द झाले आहे. तरी पीक प्रात्यक्षिकामध्ये कापूस पिकामध्ये अंतर पिकांचे नियोजन करणे हे अत्यंत महत्वाचे आहे. आंतर पिकांसाठी कृषि विदयापीठाने शिफारस केलेल्या पिकांचा समावेश करावा. कापूस हे दीर्घ हंगामी  (सुमारे ६ महिने) पीक असल्याने, सदर पिकाचा जैविक अवशेष (पाला पाचोळा, काडी, प-हाट्या, इत्यादी) शेतात गाडला जाईल असे पहावे जेणेकरुन सेंद्रिय पदार्थांचा पिकास पुरवठा होईल. त्याचप्रमाणे योग्य ती जैविक खते, कंपोष्ट खताचा वापर, संतुलित रासायनिक खताचा वापर यांचे नियोजन करावे. पाणी उपलब्ध असल्यास पिकाच्या वाढीनुसार आवश्यक त्या पिक वाढीच्या अवस्थेत पाणी देण्याचे व्यवस्थापन करावे. पाण्याच्या ताणग्रस्त अवस्थेत पिकास संरक्षित पाणी देण्याची व्यवस्था करावी. कापूस पिकावर मोठ्या प्रमाणात किड व रोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने, योजनेंतर्गत एकात्मिक किड व्यवस्थापनाद्वारे जैविक किड नियंत्रण बाबींचा अवलंब करावा जेणेकरुन रासायनिक किटकनाशकांचा वापर टाळता येईल. पर्यायाने उत्पादन खर्चात कपात साधता येईल. एकंदरीत पीक

www.mahaagri.gov.in

प्रात्यक्षिक आयोजनामुळे उत्पादन खर्चात कपात व उत्पादनात वाढ इ. बाबी सफल होतील असे पाहावे. त्यासाठी योग्य त्या नोंदी व अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यात यावा.

उत्पादकता लक्षांकः- कापूस पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रात्यक्षिक क्षेत्रासाठी जिल्हयांची जी सरासरी उत्पादकता असेल त्याच्या दुप्पट उत्पादकता लक्षांक म्हणून निश्चित करावा. किंवा ज्या गावात प्रात्यक्षिक घ्यावयाची आहेत त्या गावातील ज्या शेतक-यांची उत्पादकता सर्वाधिक असेल त्यांच्या उत्पादकतेच्या १५ टक्के अधिक उत्पादकता ही प्रात्यक्षिकाची उत्पादकता लक्षांक म्हणून निश्चित करावी.

सदरचे प्रात्यक्षिक राबविताना उपरोक्त घटकांचा अवलंब करण्यात येऊन रु.२०००/- प्रति प्रात्यक्षिक (०.४० हेक्टर) खर्च करण्यात यावा. उपरोक्त बाबी राबविताना रु.२०००/- पेक्षा जास्त होणारा खर्च सबंधित शेतकरी/संस्था यांनी करावयाचा आहे.

प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी/संस्थेकडून संबंधित विभागीय कृषि सह संचालक यांनी खालील प्रपत्रात माहिती प्राप्त करुन घेऊन संकलित अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

**प्रपत्र - ४**

| **अ. क्र.** | **प्रात्यक्षिक आयोजित केलेल्या शेतक-यांचे नंाव** | **प्रात्यक्षिकाचे क्षेत्र** | **पिकाचे वाण** | **एकात्मिक किड व्यवस्थापन अंतर्गत राबविण्यात आलेल्या बाबी** | **पीक उत्पादन खर्चात कमी/जास्त.** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

| **हेक्टरी उत्पादन** | **नियंत्रित पीक प्रात्यक्षिकाचे उत्पादन** | **पीक प्रात्यक्षिक व नियंत्रण क्षेत्राचे तुलनेत कमी/जास्त उत्पादन** | **उत्पादनात कमी/जास्तीची कारणे** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ |

रेफ्युजी पट्टा पेरणीसाठी मका चवळी ,झेंडु, तुर,ज्वारी या पिकाचा सापळा पिके म्हणुन समोवश करता येतो.

## २) शेतक-यांच्या शेतीशाळा (F.F.S) (७५% केंद्र हिस्साः२५% राज्य हिस्सा) :-

पिकाच्या संपूर्ण हंगामात दर आठवडयातून एका ठराविक दिवशी पीक उत्पादक व पीक संरक्षणाच्या विविध घटकांबाबत शेतक-यांना प्रत्यक्ष शेतावर प्रशिक्षण देण्यात येईल. शेतक-यांच्या शेतीशाळा हा घटक एकात्मिक किड व्यवस्थापन संकल्पनेशी निगडीत राबविला जातो. तथापि, हा घटक एकात्मिक पिक व्यवस्थापनेच्या संकल्पनेनुसार राबविल्यास या बाबीमध्ये एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक उर्वरित अंश व्यवस्था, पाणी व्यवस्थापन या बाबीच्या घटकांचा समावेश करण्यात येईल. जेणे करुन एकात्मिक पीक व्यवस्थापनेच्या संकल्पनेनुसार शेतक-यांच्या शेतीशाळा हा घटक राबविता येईल.

टी.ओ.एफ.व्दारे प्रशिक्षित झालेले कर्मचारी/शेतकरी/इतर संस्थांचे प्रतिनिधी हे प्रशिक्षकाचे काम करतील. प्रत्येक शेतीशाळेसाठी असे दोन प्रशिक्षक राहतील. प्रत्येक शेतीशाळेत ३० शेतक-

www.mahaagri.gov.in

यांना प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणात सहभागी शेतक-यांपैकी एखादया शेतक-याचे २ एकर क्षेत्र कापूस लागवडी करता घेऊन त्यावर पीक प्रात्यक्षिके घेतली जातील. त्याचा खर्च शेतीशाळेसाठी उपलब्ध अनुदानातून करावा. सदर प्रशिक्षण संशोधनावर आधारित शेतक-यांचे प्रत्यक्ष सहभागाने व कृतिव्दारे अनुभव या तत्वावर आधारीत राहील. त्यासाठी लागणा-या निविष्ठा वेळीच उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची राहील. शेतीशाळांचा अभ्यासक्रम स्थानिक गरजेनुरुप राहील. प्रत्येक शेतीशाळेत सहभागी असलेले शेतकरी स्वतः प्रयोगात सहभाग घेतील व त्याचे तुलनेसाठी स्थानिक पध्दतीप्रमाणे घेतलेल्या पिकाचा प्लॉटची निरिक्षणे नोंदविण्यासाठी ठेवला जाईल. शेतीशाळेच्या एकूण कालावधीत २० प्रशिक्षण वर्ग घेतले जातील. त्यातील १६ प्रशिक्षण वर्ग साप्ताहीक धर्तीवर व उर्वरित ४ प्रशिक्षण वर्ग पाक्षिक धर्तीवर घेण्यात यावेत. कृषि पर्यावरण पध्दती विश्लेषण (अॅग्रो-इको सिस्टिम अॅनालीसीस ( AESA) ही शेतीशाळेची एक प्रमुख पायाभूत बाब असून त्या आधारे सहभागी

शेतकरी पीक व्यवस्थापनाचे निर्णय घेतील. शेतीशाळेच्या प्रशिक्षणाव्दारे सहभागी शेतकरी भविष्यात शेतातील किडी/रोग ओळखून त्यांच्या नैसर्गिक शत्रुकिडींचे संवर्धन करण्यास तसेच एकात्मिक पीक व्यवस्थापनेच्या संकल्पनेनुसार पीक उत्पादनाचे व व्यवस्थापनाचे निर्णय घेण्यास सक्षम होणे, अपेक्षित आहे. प्रति शेतीशाळा अनुदानाचा दर रु.१७,०००/- राहील. शेतीशाळेसाठी लागणारे साहित्य वित्तीय नियमाचा अचलंब करून घेण्यात यावे

| **अ.क्र.** | **खर्चाची बाब शेतकरी शेती शाळा अंतर्भूत बाबी खालीलप्रमाणे** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|
| १ | रु. ७५/- प्रमाणे दोन प्रशिक्षकांसाठी २० प्रशिक्षण वर्गाकरिता मानधन | ३०००/- |
| २ | शेतीशाळेसाठी शेतीशाळेसाठी माहिती वुस्तिका, प्रात्यक्षिकाच्या निविष्ठा,व इतर अनुषंगिक खर्च | ४०००/- |
| ३ | चहापान/फराळ प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक रु.१०/- प्रती सत्र प्रति माणसी ३० शेतक-यांना | ६०००/- |
| ४ | शेतीदिन व इतर किरकोळ खर्च | ४०००/- |
| | **एकूण** | **१७०००/-** |

## ३) प्रशिक्षकांचे दीर्घ मुदतीचे प्रशिक्षण *(ToF)* (१००% केंद्र हिस्सा):-

पिकाच्या संपूर्ण हंगाम कालावधीत (१२० दिवस) प्रत्यक्ष क्षेत्रावर प्रशिक्षण देऊन त्याव्दारे भविष्यकाळासाठी चांगले प्रशिक्षक तयार करणे, हा या मागील हेतू आहे. कापूस पिकाबाबत ***(F.A.O.***) व्दारे असे प्रशिक्षण वर्ग मागील काही वर्षापासून राज्यात घेण्यात येत असून त्याव्दारे तज्ञ प्रशिक्षकही तयार झाले आहेत. सन २०१३-१४ मध्ये सधन कापूस विकास कार्यक्रमाखाली घन लागवड पध्दतीनुसार ***(HDPS)*** असे तीन प्रशिक्षण वर्ग जळगांव, अकोला, परभणी, या ठिकाणी घेण्यात येणार आहेत. त्याचा कालावधी व त्याबाबत नियोजनाची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रत्येक ***(ToF)*** मध्ये ३० प्रशिक्षणार्थी सहभागी होतील. प्रशिक्षणार्थी निवडीची कार्यवाही विभागीय कृषि सह संचालक यांनी अंतिम करावी. सदर प्रशिक्षण वर्गासाठी नोडल अधिकारी संबंधित

www.mahaagri.gov.in

जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी असतील व संपर्क अधिकारी संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी राहतील. तसे स्वतंत्रपणे आदेश वि.कृ.स.सं यांनी निर्गमित करावेत. प्रति प्रशिक्षण वर्ग अनुदानाचा दर रु.१०.०० लाख राहील.

| **अ.क्र** | **बाब प्रति टी.ओ.एफ. *(ToF)* रु.१०.०० लाख तरतूदीचा बाबनिहाय तपशील** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षक समन्वयकाचे मानधन (समन्वयक-१) (रु.२५०/- X १ X १३० दिवस) | ३२,५००/- |
| २ | प्रशिक्षकाचे मानधन (प्रशिक्षक - ३)(रु.१५०/- X ३ X १३० दिवस) | ५८,५००/- |
| ३ | प्रशिक्षणार्थींना दैनिक खर्चासाठी रक्कम (३० प्रशिक्षणार्थी) (रु.५०/-प्रति दिवस X ३० प्रशिक्षणार्थी X १२० दिवस) | १,८०,०००/- |
| ४ | संलग्न कर्मचारीवृंदासाठी दैनिक खर्चासाठी रक्कम (३ कर्मचारी) (रु.६०/-प्रति दिवस X ३ कर्मचारी X १२० दिवस) | २१,६००/- |
| ५ | हॉस्टेल चार्जेस (रु.२०/- प्रतिदिन X ३५ X १२० दिवस) | ८४,०००/- |
| ६ | क्षेत्रिय खर्चासाठी(२ हेक्टरकरिता) (रु.१५०००/-प्रति हेक्टर X २ ) | ३०,०००/- |
| ७ | प्रशिक्षण वर्गासाठी आवश्यक साहित्यासाठी (रु.१००/- X १२०) | १२,०००/- |
| ८ | एफ.एफ.एस.साठी अल्पोपहार खर्च प्रति दिन रु.१०/- प्रमाणे एफ.एफ.एस.करिता (रु.३००/- X ४ X २० सेशन्ससाठी) | २४,०००/- |
| ९ | एफ.एफ.एस.साठी प्रशिक्षण साहित्य (४ एफ.एफ.एस.करिता) | १८,०००/- |
| १० | भोजन व्यवस्था तरतूद (रु.७५/- X ३५ X १२० दिवस) | ३,१५,०००/- |
| ११ | पी.ओ.एल.चार्जेस, किरकोळ दुरुस्त्या, भाडयाने वाहने घेणे | ६०,०००/- |
| १२ | प्रशिक्षण साहित्य खरेदी | ४५,०००/- |
| १३ | संपर्क माध्यमावरील खर्च (फोन, फॅक्स इत्यादी) | १०,०००/- |
| १४ | विशेष विषयावरील व्याख्यात्यांचे मानधन (रु.४००/- X २० व्याख्याने) | ८,०००/- |
| १५ | प्रशिक्षणार्थींची क्षेत्रिय सहल | २०,०००/- |
| १६ | उद्घाटन खर्चासाठी | ५,०००/- |
| १७ | क्षेत्रीय दिन खर्चासाठी (रु.१०,००० प्रति दिवस X २ दिवस) | २०,०००/- |
| १८ | समारोप समारंभासाठी तरतूद | १५,०००/- |
| १९ | टी.ओ.एफ.चा अहवाल बनविण्याच्या खर्चासाठी तरतूद | १५,०००/- |
| २० | किरकोळ खर्चासाठी तरतूद | २६,४००/- |
| **एकूण** | **... ... ...** | **१०,००,०००/-** |

| **अक्र** | **प्रवर्तकाच्या प्रशिक्षणाचे ठिकाण** | **प्रशिक्षणासाठी जोडलेले जिल्हे** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १. | जळगाव | जळगाव, नाशिक, धुळे, नंदूरबार | |
| २. | अकोला | अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम,बुलढाणा | |
| ३. | परभणी | परभणी, नांदेड , हिंगोली, बीड, जालना, औरंगाबाद | |

www.mahaagri.gov.in

प्रशिक्षकांचे दीर्घ मुदतीचे प्रशिक्षण ***(ToF)*** साठी आवश्यक संपूर्ण अनुदान संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांचेकडे अनुदान मिळताच तात्काळ संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे वर्ग करावे.

**परोपजीवी/परभक्षी मित्र किडींचा/जैविक औषधे प्रात्यक्षिके (७५% केंद्र हिस्सा - २५% राज्य हिस्सा) :-**

सदरचे प्रात्यक्षिक १ हेक्टरवर घ्यावयाचे असून, परोपजीवी/परभक्षी मित्र किडींचा/जैविक औषधे पुरवठयासाठी रू. ९०० प्रति हे. अनुदान देय आहे.

एकात्मिक पध्दतीने पिठया ढेकून (मिलिबग) किड नियंत्रणः- मा.आयुक्त कृषि यांचे परिपत्रक क्र.सीपीएस/मिलिबग/गुनि-५, एप्रिल २००८ नुसार कापसावरील पिठया ढेकूण नियंत्रणासाठी, लागवडी पूर्व नियंत्रणासाठी क्रायसोपा, लेडीबर्ड बीटल या परोपजीवी किडीचे आवश्यक ते प्रमाण निश्चित करुन त्यांची मागणी संबधीत पुरवठादार स्संस्थेकडुन करावी.

कापूस पिकातील एकात्मिक किड व्यवस्थापनाचे दृष्टिने शेतातील किडी/रोग व त्यांचे नैसर्गिक शत्रु यांचे योग्य प्रमाण राखणे व जैविक किड नियंत्रणावर भर देणे आवश्यक आहे. पीकाच्या ३६ ते ६५ दिवसांच्या अवस्थेत परोपजीवी किडी क्षेत्रात सोडल्यास पांढ-या माशीचे नियंत्रण होऊ शकते. ३० ते ६० दिवसांच्या पिकाच्या अवस्थेत प्रती हेक्टरी ५० हजार या प्रमाणात क्रायसोपर्ला परभक्षी किड सोडल्यास पिकावरील रस शोषून घेणा-या किडींचे नियंत्रण करता येते. ट्रायकोग्रामा या परोपजीवी किडीचा वापर करुन बोंडअळीचे नियंत्रण होऊ शकते. याशिवाय ट्रायकोडर्मा, एन.पी.व्ही., बी.टी., निंबोळी अर्कयुक्त जैविक औषधे यांचा प्रभावी वापर किड/रोग नियंत्रणासाठी करता येतो.

एकात्मिक किड व्यवस्थापन या बाबीचा मोठ्या प्रमाणात प्रसार व प्रचार होणे ही अत्यावश्यक बाब असल्याने जैविक औषधांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा योजनांतर्गत अनुदानावर पुरवठा करावयाचा आहे. या औषधांचा पुरवठा करतांना तो केवळ शासनाच्या पीक संरक्षण शिफारशीतील मात्रेनुसार किंवा कृषि विद्यापीठांच्या सल्यानुसारच करण्याची दक्षता घ्यावी. जैविक औषधांच्या किंमतीच्या ५०टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ९००/- प्रति हेक्टर या आर्थिक मर्यादेत हा अनुदानाचा दर आहे. जैविक औषधांच्या २-३ मात्रा देता येतील. त्यासाठी सुध्दा औषधांची मागणी वरीलप्रमाणे पुरवठादार संस्थेकडे करावी. याबाबत अधिकृत पुरवठादार संस्था व औषधांचे दर इत्यादी तपशिल आयुक्तालयाच्या नि.व गु.नि. कक्ष-५ शाखेकदिल पत्र क्र. जाक्र/सीपीएस/जैकीना/मा.सु/२०१३-१४/६५/गुनि/२०१३दि.१३ मे, २०१३ अन्वये कळविण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सदर औषधांच्या प्रत्येक बॅचचे नमुन्यांची गुणवत्ता चाचणी करुन घेणे बंधनकारक राहील तद्नंतरच देयकांची अदायगी करण्याची दक्षता घ्यावी.

**विना अनुदान घटकः**

**i) मुलस्थानी जलसंधारण -**

जमिनीच्या प्रकारानुसार, जमिनीची खोली, जमिनीचा उतार, जमिनीचा पोत व सुपिकता यानुसार उपचार पद्धती ठेवावी. यामध्ये प्रामुख्याने जमिनीला समतल पेरणी, जमिनीच्या उताराला आडवी पेरणी, सरी वरंबा पद्धतीने मशागत इत्यादी सह सधन कापूस विकास योजनेमध्ये खरेदी केलेला सुधारित औजारांच्या प्रात्यक्षिकांचा देखील अंतर्भाव करावा जेणे करुन मशागत खर्चात कपात होते

www.mahaagri.gov.in

किंवा कसे हे तपासता येईल. यासाठी मशागत खर्च व मजुरीवरील खर्च याच्या नोंदी ठेवण्यात याव्यात.

**ii)** सेंद्रिय खतांचा वापरः- यामध्ये गांडूळ खत बायोडायनॅमिक खत, नाडेप इत्यादी घटकांचा अंतर्भाव असावा.

**iii)** हिरवळीचे खत - आवश्कतेनुसार हिरवळीच्या खतासाठीच्या पिकांची लागवड करण्यात यावी. तसेच पडीक जमिनीवर गिरीपुष्प लागवड कार्यक्रम देखील राबविण्यात यावा.

**iv)** जैविक किड रोग नियंत्रण औषधे :- यामध्ये निंबोळ्या गोळा करुन, निंबोळी अर्क, निंबोळी पावडर स्वरुपात जैविक किड रोग नियंत्रक म्हणून वापर करावा. साधारणत मे/जून च्या दरम्यान निंबोळ्यांची मोठ्या प्रमाणात गळ होत असते. अशा काळात सदर निंबोळ्या मोठ्या प्रमाणात गोळा करणे शक्य आहे.

**v)** कमी खर्चात जैविक औषधे निर्मिती :- शेतकऱ्यांनी स्वत विकसीत केलेली, स्वस्त व प्रभावी जैविक किड/रोग नियंत्रण औषध निर्मिती आहे. त्यामध्ये दशपर्णी अर्क, जिवामृत, अमृत पाणी, बिजामृत व वापसा या चार घटकांचा प्रामुख्याने समावेश आहे.

**vi)** जैविक खते :- पिकाच्या वाढीस आवश्यक असणारे मुख्य अन्न घटक जसे नत्र, स्फुरद व पालाश इत्यादी पिकास योग्य प्रमाणात करुन देण्याचे काम जैविक खते करतात.

**vii)** बियाणे बदल (Seed Replacement) :- पिकाची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने बियाणे बदलाची अत्यंत गरज आहे. कापूस पिकामध्ये १०० टक्के बियाणे बदल केला जातो. तथापि, बियाणे बदलांमध्ये गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता वाणांची निवड करणेसाठी शेतकऱ्यांना योग्य सल्ला देणेत यावा.

**iiiv)** विरळणी/नांग्या भरणे :- पिकाच्या रोपांची संख्या योग्य ठेवण्याच्या दृष्टीने एका ठिकाणी फक्त एक निरोगी रोप राहील याची दक्षता घ्यावी. ज्या ठिकाणी बियाणांची लागवड झालेली नसेल अशा ठिकाणी पुन्हा लागवड करण्यात यावी.

**ix)** मधुमक्षी पालन परागीकरण :- पिकाचे परागीकारणाद्वारे फलधारणेसाठी मधुमक्षी पालन सारख्या घटकाचा सदर पिक प्रात्यक्षिकामध्ये समावेश करण्यात यावा. साधारणत एका गावात एक मधुमख्खी पालन प्रकल्प राबविण्यात यावा.

**x)** कापसाची प्रतवारी राखण्यासाठी कापूस वेचणी, साठवणी व हाताळणी या प्रक्रीयांवर भर दिल्यास त्याचा निर्यातीसाठी व शेतक-यांना चांगला भाव मिळवून देण्याचे दृष्टीने उपयोग होईल.

**xii)** कापुस वेचणी अनुषंगाने एका गावात एकाच वाणाची लागवड करणेबाबत शेतक-यांना प्रवृत्त करण्यात यावे तसेच कापुस वेचणी करताना स्वच्छ कापुस वेचणीवरती भर देण्यात यावा, वाणनिहाय कापुस वेगळा ठेवण्यात यावा यासाठी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात यावे, जेणेकरुन कापुस विक्रीमध्ये शेतक-यांना चांगला भाव मिळवून देण्याचे दृष्टीने उपयोग होईल.

**योजनेचे संनियंत्रण :**

योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीच्या दृष्टिने खालील टक्केवारीप्रमाणे योजना अंमलबजावणीच्या खर्चाची तपासणी करावी. तपासणी मध्ये योजनेतील सर्व बाबींचा अंतर्भाव असावा. तपासणीचा अहवाल मासिक प्रगती अहवालासोबत नियमितपणे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यन्त आयुक्तालयास पाठवावा.

www.mahaagri.gov.in

योजनांतर्गत लाभार्थीची निवड अल्प/अत्यल्प भू-धारकांना सर्वाधिक प्राधान्य देण्यात यावे. किमान १०.२० टक्के अनुसूचित जाती प्रवर्गासाठी व किमान ८.९० टक्के अनुसूचित जमाती व ८०१.९० टक्के इतर प्रवर्गासाठी राहील. एकूण लाभधारकांपैकी ३० टक्के हिस्सा महिला शेतक-यांसाठी उपलब्ध करुन दिला जावा. संवर्गातील लाभधारकांना केंद्र शासनाच्या निदेशाप्रमाणे लाभ देण्यात यावा व झालेले भोतिक/आर्थीक साध्याची नोंद महिन्याच्या मासिक प्रगति अहवालात स्वतंत्र रित्या दर्शविण्यात यावी.

| अ.न | तपासणी अधिकारी | तपासणीची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सह संचालक | २ |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | ३ |
| ३ | कृषि विकास अधिकारी | ५ |
| ४ | उप विभागीय कृषि अधिकारी | १० |
| ५ | तालुका कृषि अधिकारी | २० |
| ६ | मंडल कृषि अधिकारी | ५० |
| ७ | कृषि पर्यवेक्षक | १०० |

योजनेचा तिमाही खर्च/भौतिक साध्य खाली दर्शविलेल्या टक्केवारीपेक्षा कमी असणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.मासिक प्रगती अहवालात दर्शविलेला खर्च भौतिक साध्याच्या प्रमाणात असावा.

| अ.क्र | कालावधी | खर्चाची टक्केवारी | प्रागतिक टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल ते जून | २० | २० |
| २ | जुलै ते सप्टेंबर | ४० | ६० |
| ३ | आक्टोबर ते डिसेंबर | २० | ८० |
| ४ | जानेवारी ते मार्च | २० | १०० |

याबाबत सनियंत्रण विभागीय कृषि सह संचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वेळोवेळी तपासणी करुन तसा अहवाल पाठवावा.

**आर्थिक बाबी :**

या योजनेसाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली करण्यात यावा व २०१३-१४ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

| **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वापरावयाचे लेखाशिर्ष**<br>**लेखाशिर्ष (केंद्र हिस्सा ७५%)** |
|---|
| मागणी क्र.- डी -३, २४०१ - पीक संवर्धन,<br>१०८-वाणिज्यिक पीके, १०८(१)(बी) - पंचवार्षिक योजनातंर्गत योजना, केंद्र पुरस्कत योजना,<br>(०१)(०२) - कापूस विकासासाठी तंत्रज्ञान अभियान,,<br>३३ अर्थ सहाय्य, ( २४०१ २५४२) |

आपणांस दिलेल्या बाबनिहाय आर्थिक मर्यादेपर्यंत आपले स्तरावर बदल करण्यात येऊ नये. बाबींच्या अंतर्गत बदलास फक्त केंद्र शासन सक्षम असल्याने हे बदल आपल्या स्तरावर करण्यात

www.mahaagri.gov.in

येऊ नयेत.काही बदल आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे प्रस्ताव पाठवावा म्हणजे केंद्र शासनास त्याप्रमाणे विनंती करण्यात येईल.जिल्हयाने त्यांना दिलेल्या आर्थिक कार्यक्रम मर्यादेचे उल्लंघन करु नये.योजनेच्या मार्गदर्शक सूचना तक्त्यामधील माहिती स्वयंस्पष्ट आहे. तरीही सदर योजना राबविताना काही अडचणी आल्यास शंका असल्यास कृषि उपसंचालक (नगदी पिके), दुरध्वनी क्रमांक ०२०/५५३७६८९ वर संपर्क साधावा.

**मा. आयुक्त कृषि यांचे मान्यतेने**

**कृषि संचालक,**
**(विस्तार व प्रशिक्षण),**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

## केंद्र पुरस्कृत एकात्मिक कापूस विकास कार्यक्रम सन २०१३-१४ (रु.लाख)

| अक्र | घटक | परिमाण | अनुदानाचा दर (रु.) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतिक | आर्थिक | केंद्र | राज्य |
| १ | पीक उत्पादन तंत्रज्ञान क्षेत्रीय प्रात्यक्षिक | एकर | रु.२०००/- प्रात्यक्षिक (प्रात्यक्षिक क्षेत्र ०.४० हेक्टर) | ६००० | १.२० | १२०.०० | ०.०० |
| २ | शेतकरी शेतीशाळा | संख्या | रु.१७,०००/- शेतीशाळा (३० शेतकरी पूर्ण हंगामाकरिता) | २५९ | ४४.०२ | ३३.०२ | ११.०० |
| ३. | प्रवर्तकांचे प्रशिक्षण | संख्या | रु.१०.०० लाख /-प्रति प्रशिक्षण( ६ महिन्याचे प्रशिक्षण कालावधीसाठी) | ३ | ३०.०० | ३०.०० | ०.०० |
| ४. | जैविक औषधे प्रात्यक्षिके | हेक्टर | औषधाच्या किमतीच्या ५० टक्के किंवा रू.९००/-/-प्रति हे. च्या मर्यादेत यापैकी कमी असेल ते. | ५२१८ | ४६.९६ | ३५.२२ | ११.७४ |
| ५. | आकस्मीक निधी | | | | २.३८ | १.७८५ | ०.५९५ |
| | **एकूण** | | | | **२४३.३७** | **२२०.००** | **२३.३४** |

**<u>केंद्र वुरस्कृत एकात्मिक कापूस विकास कार्यक्रम सन २०१३-१४ वा कार्यक्रम (रू.हजारात)</u>**

www.mahaagri.gov.in

| अ.क्र | जिल्हा | प्रकल्प संख्या | पिक उत्पादन तंत्रज्ञान प्रात्यक्षीक | | वर्गवारी अनुसार राबविणे साठी पिक उत्वादप तंत्रज्ञान | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रू.2000 प्रति प्रात्यक्षीक( प्रात्यक्षीक त्रेत्र 0.40.हे) | | अनुसुचित जाती | | अनुसुचित जमाती | | इतर | | एकुन | |
| | | | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | नाशीक | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| २ | धुळे | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| ३ | नंदुरबार | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| ४ | जळगाव | २ | ५०० | १००० | ५३ | १०६ | ४६ | ९२ | ४०६ | ८१२ | ५०५ | १०१० |
| नाशीक विभाग | | ५ | १२५० | २५०० | १२८ | २५६ | ११२ | २२४ | १०१२ | २०२४ | १२५२ | २५०४ |
| ५ | अहमदनगर | २ | ५०० | १००० | ५२ | १०४ | ४५ | ९० | ४०५ | ८१० | ५०२ | १००४ |
| पुणे विभाग | | २ | ५०० | १००० | ५२ | १०४ | ४५ | ९० | ४०५ | ८१० | ५०२ | १००४ |
| ६ | औरंगाबाद | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| ७ | जालना | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| ८ | बीड | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| औरंगाबाद विभाग | | ३ | ७५० | १५०० | ७५ | १५० | ६६ | १३२ | ६०६ | १२१२ | ७४७ | १४९४ |
| ९ | नांदेड | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| १० | परभणी | २ | ५०० | १००० | ५२ | १०४ | ४५ | ९० | ४०५ | ८१० | ५०२ | १००४ |
| ११ | हिंगोली | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| लातुर विभाग | | ४ | १००० | २००० | १०२ | २०४ | ८९ | १७८ | ८०९ | १६१८ | १००० | २००० |
| १२ | बुलढाण | २ | ५०० | १००० | ५२ | १०४ | ४५ | ९० | ४०५ | ८१० | ५०२ | १००४ |
| १३ | अकोला | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| १४ | वाशीम | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| १५ | अमरावती | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| १६ | यवतमाळ | २ | ५०० | १००० | ५३ | १०६ | ४५ | ९० | ४०५ | ८१० | ५०३ | १००६ |
| अमरावती विभाग | | ७ | १७५० | ३५०० | १८० | ३६० | १५६ | ३१२ | १४१६ | २८३२ | १७५२ | ३५०४ |
| १७ | वर्धा | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| १८ | नागपुर | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| १९ | चंद्रपुर | १ | २५० | ५०० | २५ | ५० | २२ | ४४ | २०२ | ४०४ | २४९ | ४९८ |
| नागपुर विभाग | | ३ | ७५० | १५०० | ७५ | १५० | ६६ | १३२ | ६०६ | १२१२ | ७४७ | १४९४ |
| आयुक्तालय स्तर | | | ० | ० | ० | ० | ० | | ० | | ० | ० |
| एकुन महाराष्ट्र राज्य | | २४ | ६००० | १२००० | ६१२ | १२२४ | ५३४ | १०६८ | ४८५४ | ९७०८ | ६००० | १२००० |

www.mahaagri.gov.in

| अ.क्र | जिल्हा | शेतकरी शेती शाळा | | | | वर्गवारी अनुसार राबविणे साठी शेतकरी शेती शाळा लक्षांक | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रू.17000- प्रति शेती शाळा (30 शतकरी प्रशिक्षण पुर्ण हंगामा करीता | | प्रकल्पातील कार्यक्रम | प्रकल्पा बाहेर राबविण्याचा कार्यक्रम | अनुसुचित जाती | | अनुसुचित जमाती | | इतर | | एकुन | |
| | | भौतिक | आर्थीक | भौतिक | भौतिक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक |
| १ | २ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| १ | नाशीक | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| २ | धुळे | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| ३ | नंदुरबार | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| ४ | जळगाव | २१ | ३५७ | १० | ११ | ३ | ५१ | २ | ३४ | १७ | २८९ | २२ | ३७४ |
| नाशीक विभाग | | ५४ | ९१८ | २५ | २९ | ६ | १०२ | ५ | ८५ | ४४ | ७४८ | ५५ | ९३५ |
| ५ | अहमदनगर | २१ | ३५७ | १० | ११ | २ | ३४ | २ | ३४ | १७ | २८९ | २१ | ३५७ |
| पुणे विभाग | | २१ | ३५७ | १० | ११ | २ | ३४ | २ | ३४ | १७ | २८९ | २१ | ३५७ |
| ६ | औरंगाबाद | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| ७ | जालना | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| ८ | बीड | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| औरंगाबाद विभाग | | ३३ | ५६१ | १५ | १८ | ३ | ५१ | ३ | ५१ | २७ | ४५९ | ३३ | ५६१ |
| ९ | नांदेड | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| १० | परभणी | २१ | ३५७ | १० | ११ | २ | ३४ | २ | ३४ | १७ | २८९ | २१ | ३५७ |
| ११ | हिंगोली | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| लातुर विभाग | | ४३ | ७३१ | २० | २३ | ४ | ६८ | ४ | ६८ | ३५ | ५९५ | ४३ | ७३१ |
| १२ | बुलढाण | २१ | ३५७ | १० | ११ | ३ | ५१ | १ | १७ | १७ | २८९ | २१ | ३५७ |
| १३ | अकोला | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| १४ | वाशीम | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| १५ | अमरावती | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| १६ | यवतमाळ | २१ | ३५७ | १० | ११ | २ | ३४ | २ | ३४ | १६ | २७२ | २० | ३४० |
| अमरावती विभाग | | ७५ | १२७५ | ३५ | ४० | ८ | १३६ | ६ | १०२ | ६० | १०२० | ७४ | १२५८ |
| १७ | वर्धा | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| १८ | नागपुर | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| १९ | चंद्रपुर | ११ | १८७ | ५ | ६ | १ | १७ | १ | १७ | ९ | १५३ | ११ | १८७ |
| नागपुर विभाग | | ३३ | ५६१ | १५ | १८ | ३ | ५१ | ३ | ५१ | २७ | ४५९ | ३३ | ५६१ |
| आयुक्तालय स्तर | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० |
| एकुन महाराष्ट्र राज्य | | २५९ | ४४०३ | १२० | १३९ | २६ | ४४२ | २३ | ३९१ | २१० | ३५७० | २५९ | ४४०३ |

www.mahaagri.gov.in

| अ.क्र | जिल्हा | जैविक किडनाशक व जैविक औषधी प्रात्यक्षिके | | | | वर्गवारी अनुसार राबविणे साठी जैविक किडनाशक व जैविक औषधी प्रात्यक्षिके लक्षांक | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रू.900- प्रति हेक्टर मर्यादेत | | प्रकल्पातील कार्यक्रम | प्रकल्पा बाहेर राबविण्याचा कार्यक्रम | अनुसुचित जाती | | अनुसुचित जमाती | | इतर | | एकुन | |
| | | भौतिक | आर्थीक | भौतिक | भौतिक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक | भौतिक | आर्थीक |
| १ | २ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ |
| १ | नाशीक | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| २ | धुळे | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| ३ | नंदुरबार | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| ४ | जळगाव | ४३६ | ३९२ | २०० | २३६ | ४५ | ४१ | ४० | ३६ | ३५४ | ३१९ | ४३९ | ३९५ |
| नाशीक विभाग | | १०८७ | ९७८ | ५०० | ५८७ | १११ | १०० | ९७ | ८७ | ८७९ | ७९१ | १०८७ | ९७८ |
| ५ | अहमदनगर | ४३६ | ३९२ | २०० | २३६ | ४५ | ४१ | ४० | ३६ | ३५४ | ३१९ | ४३९ | ३९५ |
| पुणे विभाग | | ४३६ | ३९२ | २०० | २३६ | ४५ | ४१ | ४० | ३६ | ३५४ | ३१९ | ४३९ | ३९५ |
| ६ | औरंगाबाद | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| ७ | जालना | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| ८ | बीड | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| औरंगाबाद विभाग | | ६५१ | ५८६ | ३०० | ३५१ | ६६ | ५९ | ५७ | ५१ | ५२५ | ४७३ | ६४८ | ५८३ |
| ९ | नांदेड | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| १० | परभणी | ४३६ | ३९२ | २०० | २३६ | ४५ | ४१ | ४० | ३६ | ३५४ | ३१९ | ४३९ | ३९५ |
| ११ | हिंगोली | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| लातुर विभाग | | ८७० | ७८३ | ४०० | ४७० | ८९ | ८० | ७८ | ७० | ७०४ | ६३४ | ८७१ | ७८४ |
| १२ | बुलढाण | ४३६ | ३९२ | २०० | २३६ | ४५ | ४१ | ३९ | ३५ | ३५५ | ३२० | ४३९ | ३९५ |
| १३ | अकोला | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| १४ | वाशीम | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| १५ | अमरावती | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| १६ | यवतमाळ | ४३६ | ३९२ | २०० | २३६ | ४४ | ४० | ३९ | ३५ | ३५५ | ३२० | ४३८ | ३९४ |
| अमरावती विभाग | | १५२३ | १३७१ | ७०० | ८२३ | १५५ | १४० | १३५ | १२२ | १२३५ | १११२ | १५२५ | १३७३ |
| १७ | वर्धा | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| १८ | नागपुर | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| १९ | चंद्रपुर | २१७ | १९५ | १०० | ११७ | २२ | २० | १९ | १७ | १७५ | १५८ | २१६ | १९४ |
| नागपुर विभाग | | ६५१ | ५८६ | ३०० | ३५१ | ६६ | ५९ | ५७ | ५१ | ५२५ | ४७३ | ६४८ | ५८३ |
| आयुक्तालय स्तर | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुन महाराष्ट्र राज्य | | ५२१८ | ४६९६ | २४०० | २८१८ | ५३२ | ४७९ | ४६४ | ४१८ | ४२२२ | ३८०० | ५२१८ | ४६९६ |

www.mahaagri.gov.in

| अ.क्र | जिल्हा | प्रवर्तकांना प्रशिक्षण रू.10.00 लाख/टीओएफ(6 महिण्याचे प्रशिक्षण)) | | आकस्मीक निधी | एकुण आर्थीक | केंद्र | डिपीडिसी | एकुण आर्थीक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थीक | आर्थीक | | | | |
| १ | २ | ३८ | ३९ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ |
| १ | नाशीक | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| २ | धुळे | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| ३ | नंदुरबार | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| ४ | जळगाव | १ | १००० | २० | २७६९ | २५७७ | १९२ | २७६९ |
| नाशीक विभाग | | १ | १००० | ५० | ५४४६ | ४९६० | ४८७ | ५४४६ |
| ५ | अहमदनगर | ० | ० | १९ | १७६८ | १५७६ | १९२ | १७६८ |
| पुणे विभाग | | ० | ० | १९ | १७६८ | १५७६ | १९२ | १७६८ |
| ६ | औरंगाबाद | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| ७ | जालना | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| ८ | बीड | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| औरंगाबाद विभाग | | ० | ० | ३० | २६७७ | २३८३ | २९४ | २६७७ |
| ९ | नांदेड | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| १० | परभणी | १ | १००० | २० | २७६९ | २५७७ | १९२ | २७६९ |
| ११ | हिंगोली | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| लातुर विभाग | | १ | १००० | ४० | ४५५४ | ४१६६ | ३८९ | ४५५४ |
| १२ | बुलढाण | ० | ० | १९ | १७६८ | १५७६ | १९२ | १७६८ |
| १३ | अकोला | १ | १००० | १० | १८९२ | १७९४ | ९८ | १८९२ |
| १४ | वाशीम | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| १५ | अमरावती | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| १६ | यवतमाळ | ० | ० | २० | १७६९ | १५७७ | १९२ | १७६९ |
| अमरावती विभाग | | ० | १००० | ६९ | ७२१५ | ६५३६ | ६७९ | ७२१५ |
| १७ | वर्धा | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| १८ | नागपुर | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| १९ | चंद्रपुर | ० | ० | १० | ८९२ | ७९४ | ९८ | ८९२ |
| नागपुर विभाग | | ० | ० | ३० | २६७७ | २३८३ | २९४ | २६७७ |
| आयुक्तालय स्तर | | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुन महाराष्ट्र राज्य | | ३ | ३००० | २३८ | २४३३७ | २२००३ | २३३४ | २४३३७ |

www.mahaagri.gov.in